# जिल्हा सहकारी निवडणुक अधिकारी

## तथा विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, नाशिक विभाग, नाशिक यांचे समोर

(महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणुक) नियम २०१४ मधील नियम १० (४) अन्वये ठराव व दुरुस्ती)

---

४

वाचावे :-**महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणुक) नियम २०१४ मधील नियम १० (४) मधील तरतुद**

१) स्व. अशोकराव मोरे विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मर्या. पिंपळगांव कोंझिरा ता. संगमनेर
२) पिंप्रीलौकी अजमपुर विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मर्या., पिंप्री लौकी, ता. संगमनेर, जि.अहमदनगर
३) देवगांव विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मर्या. देवगांव ता. संगमनेर
४) कासारा दुमाला विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मर्या. कासारा दुमाला ता. संगमनेर
५) श्री. भैरवनाथ टाकळी लोणार विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मर्या. टाकळी लोणार ता. श्रीगोंदा
६) भोळेवाडी आदिवासी विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मर्या. भोळेवाडी ता. अकोले
७) औरंगपुर विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मर्या. औरंगपुर ता. अकोले
८) आगडगांव विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मर्या. आगडगांव ता. अहमदनगर
९) जवळके विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मर्या. जवळके ता. कोपरगांव
१०) मुरमे विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मर्या. मुरमे ता. नेवासा
११) भालगांव विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मर्या. भालगांव ता. पाथर्डी

**अर्जदार**

जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, अहमदनगर — **प्रतिवादी क्रं.०१**

उप / सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था,
संगमनेर/अकोले/अहमदनगर/श्रीगोंदा/कोपरगांव/नेवासा/पाथर्डी/ — **प्रतिवादी क्रं.०२**

**(या बँकेची संचालक मंडळ पंचवार्षिक निवडणुक कालावधी सन २०२०-२५ साठी दिनांक ७/०१/२०२१ रोजी प्रसिध्द केलेल्या अंतिम मतदार यादीतील मयत प्रतिनिधीचे नावात बदल करण्याबाबत नियम १० (४) नुसार प्राप्त झालेल्या ठरावा बाबतची सुनावणी)**

-कृ.मा.प.

**प्रस्तावना -**

दि अहमदनगर डिस्ट्रीक्ट सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बॅंक लि., अहमदनगर या बँकेची संचालक मंडळ पंचवार्षिक निवडणुक कालावधी सन २०२०-२५ साठीची निवडणुक प्रक्रिया सुरु झालेली असुन प्रस्तुत निवडणुक प्रक्रियेत बँकेची मतदारांची अंतिम मतदार यादी या कार्यालयामार्फत दिनांक ०७/०१/२०२१ रोजी प्रसिध्द करण्यात आलेली आहे. त्याअनुषंगाने उपरोक्त नमुद १ ते ११ अर्जदार सभासद संस्थांनी महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणुक) नियम २०१४ मधील नियम १० (४) नुसार त्यांचे दरम्यानचे काळात मयत झालेल्या प्रतिनिधीचे नाव बदलण्यासाठीचे ठराव जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, अहमदनगर यांचे कार्यालयाकडुन या कार्यालयास प्राप्त झालेले आहेत. त्याअनुषंगाने सर्व संबधितांना या कार्यालयाने दिनांक २०/०१/२०२१ रोजी सुनावणी देऊन दाखल केलेल्या ठरावांची व कादपत्रांची पडताळणी केलेली आहे.

**निष्कर्ष व अभिप्राय –**

महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणुक) निवडणुक नियम २०१४, नियम १०(४) मध्ये संस्थेने प्रतिनिधित्वाबाबत केलेला ठराव हा प्रतिनिधीचा मृत्यु झाल्यास अथवा संस्थेची समिती सदस्य नव्याने निवडणुक होऊन नविन समिती सदस्य निवडुन आल्यास ठराव बदल करता येईल अशी तरतुद विचारात घेता उपरोक्त १ ते ११ संस्थानी त्यांचे यापुर्वी प्रतिनिधी म्हणुन नियुक्त केलेल्या व्यक्तिंचे मृत्यु झाल्या कारणाने नव्याने दाखल केलेले प्रतिनिधी बदलाचे ठराव हे कायदेशीर असल्याचे दिसुन आलेले आहे.

उपरोक्त वस्तुस्थिती पहाता, उपरोक्त नमुद १ ते ११ यांचे नविन प्रतिनिधींची नावे अंतिम मतदार यादीत समाविष्ट करणे कायदेशीर होईल या निर्णयाप्रत येऊन मी खालील प्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## - आदेश -

१. मी डॉ ज्योती लाठकर, जिल्हा सहकारी निवडणुक अधिकारी, तथा विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, नाशिक विभाग, नाशिक मला महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणुक) नियम २०१४ मधील नियम १० (४) अन्वये प्रदान केलेल्या अधिकाराचा वापर करुन उपरोक्त् १ ते ११ अर्जदार संस्थेंचा दावा / ठराव मान्य करण्यात येत आहे.

२. बँकेच्या संचालक मंडळ निवडणुकीसाठी प्रसिध्द केलेल्या **प्राथमिक कृषि पतपुरवठा व विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था तसेच धान्य अधिकोष सहकारी संस्था** प्रतिनिधी मतदार संघात सोबत जोडलेलया **परीशिष्ट 'अ'** प्रमाणे संस्थाचे नावासमोरील यापुर्वीचे प्रतिनिधीचे नाव वगळुन नविन ठरावान्वये नियुक्त करण्यात आलेल्या प्रतिनिधीचे नाव समाविष्ट करण्यात येत आहे.

**स्थळ – नाशिक**
**दिनांक – २०/०१/२०२१**

( ज्योती लाठकर )
जिल्हा सहकारी निवडणुक अधिकारी
तथा विभागीय सहनिबंधक,
सहकारी संस्था, नाशिक विभाग, नाशिक

४४५

जा.क्र.वि-३/अेडीसीसीबँक/नियम १०(४)/निर्णय/२०२१
विभागीय सहनिबंधक, सहकारी संस्था, नाशिक
विभाग, नाशिक यांचे कार्यालया, तिसरा मजला,
गृहनिर्माण भवन, गडकरी चौक, नाशिक
दिनांक — २०/०१/२०२१

**प्रत** —

१. अर्जदार / प्रतिवादी.

२. निवडणुक निर्णय अधिकारी दि अहमदनगर डिस्ट्रीक्ट सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बॅक लि., अहमदनगर तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था,अहमदनगर

२/- उक्त आदेशान्वये सोबतचे **परीशिष्ट 'अ'** प्रमाणे झालेला बदल अंतिम मतदार यादीत ग्राहय धरुन त्या प्रमाणे उचित कार्यवाही करण्यात यावी.

**प्रत माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी** —

१) जिल्हा सहकारी निवडणुक अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, अहमदनगर

२) मुख्य कार्यकारी अधिकारी, अहमदनगर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि., अहमदनगर

**परीशिष्ट-अ**

दि अहमदनगर डिस्ट्रीक्ट सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बॅक लि., अहमदनगर पंचवार्षिक निवडणुक कालावधी सन २०२०-२१ ते २०२५-२६

**(गट — अ - प्राथमिक कृषि पतपुरवठा व विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था तसेच धान्य अधिकोष सहकारी संस्था मतदार संघ)**

महाराष्ट्र सहकारी संस्था (समिती निवडणुक )निवडणुक नियम, २०१४ मधील नियम १० (४) नुसार पुर्वीचे प्रतिनिधी नाव वगळुन नविन प्रतिनिधीचे नाव समाविष्ट करणे

| तालुका | अंतिम मतदार यादीतील अ.क्र. | सभासद संस्थेचे नाव | वगळावयाचे प्रतिनिधीचे नाव | नव्याने समाविष्ट करावयाचे प्रतिनिधीचे नाव | लिंग | वय | पत्ता |
|---|---|---|---|---|---|---|---|
| अकोले | ३३ | भोळेवाडी आदिवासी विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मर्या., भोळेवाडी, | देशमुख शांताबाई गुलाब | देशमुख आंबादास गंगाधर | पु. | ६५ | मु पो भोळेवाडी |
| अकोले | ६८ | औरंगपुर विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मर्या.,औरंगपुर, | वाळुंज भाऊसाहेब शंकर | वाळुंज रावसाहेब विठ्ठल | पु. | ५२ | मु.पो.औरंगपुर |
| कोपरगांव | ५८ | जवळके विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मर्या., जवळके, ता. कोपरगांव | थोरात सोपान रुंजा | थोरात सुनिल सोपान | पु | ३८ | मु पो जवळके |
| अहमदनगर | १० | आगडगांव विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मर्या., आगडगांव, | कराळे तुकाराम बाळु | कराळे सुर्यभान यादव | पु | ६५ | मु पो आगडगांव |
| नेवासा | १०२ | मुरमे विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मर्या., मुरमे | वरखेडे आप्पासाहेब कुंडलिक | वरखडे सचिन आप्पासाहेब | पु | २५ | मु मुरमे, पो. देवगड |
| पाथर्डी | १८ | भालगांव विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मर्या., भालगांव | खेडकर पांडुरंग आबाजी | खेडकर उषाताई पांडुरंग | स्त्री | ६० | मु.पो.भालगांव |
| संगमनेर | ९९ | स्व. अशोकराव मोरे विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मर्या., पिंपळगाव कोझिंरा | मोरे बाळासाहेब बबन | मोरे दिलीप कृष्णराव | पु. | ६९ | रा.पिंपळगाव कोझिंरा |
| | ६६ | पिंप्रीलौकी अजमपुर विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मर्या., पिंप्रीलौकी | दातीर बाळकृष्ण भिकाजी | लावरे शंकर दादा | पु | ६६ | मु पो पिंप्रीलौकी |
| | २२ | देवगांव विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मर्या., देवगांव | कोटकर एकनाथ वामन | पावसे नामदेव गंगाधर | पु. | ५९ | मु.देवगांव, पो.निमगांवटेंभी |
| | ३४ | कासारा दुमाला विविध कार्याकारी सेवा सहकारी संस्था मर्या., कासारा दुमाला | गुंजाळ अशोक पाटीलबा | वाळके किसन बबन | पु. | ४९ | मु पो.कासारा दुमाला |
| श्रीगोंदा | ९५ | श्री भैरवनाथ टाकळी लोणार विविध कार्यकारी सेवा सहकारी संस्था मर्या., टाकळी लोणार | पोखरणा सतिश श्रीपल | कानगुडे शरद पंढरीनाथ | पु. | ४० | मु पो टाकळी लोणार |

जिल्हा सहकारी निवडणुक अधिकारी
तथा विभागीय सहनिबंधक,
सहकारी संस्था, नाशिक विभाग, नाशिक